| **CNR MHKO200002582021** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | ०९ | ०८ | २०२१ |
| | नोंदणी तारीख | – | ०९ | ०८ | २०२१ |
| | निकाल तारीख | – | १३ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०४ | ०९ | ०४ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात ( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमीत फौजदारी खटला क्रं.५२/२०२१**
**न्यायनिर्णय नि.क्र.५८/ब**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १३ मे २०२६.**

कळे पोलीस ठाणे,ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर गु.र.नं.५८/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ३५४(ब),३२३,५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत सहा. पोलीस निरीक्षक,<br>कळे पोलीस ठाणे, ता.पन्हाळा<br>जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री.पी.एच. सावंत |
| आरोपी | १. | सागर आनंदा पाटील, व.व. ३७ |
| | २. | सौ. तेजस्वीनी सागर पाटील, व.व. ३७ |
| | | दोघे रा. टी. कॉर्नर, गणेश मंदीर शेजारी, सुळे, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर. |
| आरोपींतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही.एस.पाटील |

**भाग–ब**
**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २४.०४.२०२१ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २४.०४.२०२१ |
| दोषारोपपत्र न्यायालयात पाठविल्याचा दिनांक | :– | ०९.०८.२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | १६.०७.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २०.१२.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १३.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सागर आनंदा पाटील | २६/०४/२०२१ | २६/०४/२०२१ | भा.दं.वि. संहिता कलम ३५४(ब), ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| २. | सौ. तेजस्वीनी | २६/०४/२०२१ | २६/०४/२०२१ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |

**<u>भाग–क</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | **''X'' (गोपनीयतेकरिता)** | फिर्यादी | १६ |
| २. | सखाराम गणू पाटील | जखमी | ३० |
| ३. | तानाजी शिवाजी पाटील | जप्ती पंच | ३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | डॉ. विदयानंद हिंदूराव शिरोलीकर | वैद्यकीय अधिकारी | ४० |
| ५. | कमल संजय वाकरेकर | साक्षीदार | ४५ |
| ६. | अनिता अनिल पाटील | साक्षीदार | ४६ |
| ७. | वंदना विश्वास ढोकरे | साक्षीदार | ४७ |
| ८. | शंकर विष्णू पाटील | तपासी अंमलदार | ४९ |

**ब. बचाव पक्ष**

| **सा.क्रं.** | **साक्षीदारांचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

**क. न्यायालय**

| **सा.क्रं.** | **साक्षीदारांचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

## अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

**अ. अभियोगपक्ष (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १७ | तक्रार |
| २. | १८ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | १९ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | २० | जप्ती पंचनामा |
| ५. | २१ | फिर्यादीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे न्यायालयालयात दि.२७/०४/२०२१ रोजी नोंदवलेला जबाब |
| ६. | ४१ | फिर्यादी यांचे एम.एल.सी. वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ७. | ४२ | जखमी सखाराम गणू पाटील यांचे एम.एल.सी. वैद्यकीय प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ८. | ४३ | सोनाबाई सखाराम पाटील यांचे एम.एल.सी. वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ९. | ५० | तपासाबाबत लेखी आदेश |
| १०. | ५१ ते ५३ | साक्षीदार क्रं.५ ते ७ कमल संजय वाकरेकर, अनिता अनिल पाटील, वंदना विश्वास ढोकरे यांचे जबाब |
| ११. | ५४ | जप्त मिरची पुडे कळे पोलीस स्टेशन येथील मुद्देमाल शिरस्तेदार यांचेकडे जमा केलेबाबतची पावती |
| १२. | ५५ | तिन्ही जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र मिळणेकामी वैदयकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, कळे यांना पाठवलेले पत्र |

**ब. बचावपक्ष (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. अभियोगपक्ष (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोप पत्र |
| २. | ९ | दोषारोप |
| ३. | १० व ११ | आरोपीचे निवेदन |
| ४. | ५६ व ५७ | आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब |

**ड.भौतिक वस्तु**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | वस्तु २ | एक गुलाबी ब्लाऊज पुढील बाजुस तीन हुक आहे ते तुटलेले दिसत असुन फाटलेले दिसत आहे, ब्लाऊज वर हीरवी पट्टी आहे जुना वापरता |
| २. | वस्त १ | एक ५ वारी साडी तपकरी रंगाची हिरव्या फुलाची डिझायन असलेली |

| | | |
|---|---|---|
| | | पदरास फाटलेली जुनी वापरती |
| ३. | वस्तु ३ | मिरची पुड पांड–या कागदात बांधलेली |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक १३/०५/२०२६ रोजी घोषित)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४(ब),३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याची संपरिक्षा दाखल आहे.

**०२.** विनयभंग अथवा लैगिंक गुन्हयातील पीडितेचा सामाजिक छळ किंवा बहिष्कार रोखण्याचा सामाजिक उद्देश लक्षात घेऊन, न्यायालयाने निकालात पीडीतेचे नाव न दर्शवणे बंधनकारक आहे असे निर्देशित केल्यामुळे. या न्यायालयाने तिचे वर्णन निकालात ''**X**'' असे करणे ठरवले आहे.

**०३.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दि.२४/०४/२०२१ रोजी सकाळी ०९.४५ चे सुमारास फिर्यादी ''X" यांचे राहते घरासमोर रोडवर, सुळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे फिर्यादी राहते घराच्या गॅलरीत कपडे वाळत घालत असताना त्यांचे घरासमोर राहणारे आरोपी सागर आनंदा पाटील व त्यांची पत्नी सौ.तेजस्विनी सागर पाटील असे दोघांनी फिर्यादीच्या घराच्या दारात येवुन दारातील शेण काढण्याच्या कारणावरुन फिर्यादीला वाईट वंगाळ शिवीगाळ करुन लागले म्हणुन फिर्यादी, तिचे सासु–सारे असे दारात आले असता आरोपी सागर पाटील याने फिर्यादीला उद्देशुन ''रांड झवुन घेणार होतीस का रस्त्यावर का सोय–याला घेवुन झेपणार होतीस म्हणुन तुला पडलेले शेण स्वच्छ करुन पाहिजे होते काय'' असे म्हणाला. तेव्हा आजरोजी तेजस्विनी हिने फिर्यादीला '' तुझ आता काय खर नाही तुला सोडणार नाही'' अशी धमकी देत असताना आरोपी सागर

पाटील हा हातात काठी घेवुन अंगरावर धाऊन येवुन फिर्यादीला हाताने मारहाण करुन फिर्यादीच्या ब्लाऊज मध्ये हात घालुन फिर्यादीला विवस्त्र करण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे ब्लाऊज व साडी फाडली व त्यामुळे फिर्यादीचे मनास लज्ञा निर्माण होईल असे कृत्य केले. तेवढयात आरोपी तेजस्विनी हिने सुध्दा फिर्यादीच्या अंगावर मिरचीपुड टाकुन फिर्यादीला लाथाबुक्कयांनी मारहाण केली असता फिर्यादीच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र तुटुन गळयात अडकले होते ते फिर्यादी एकत्र करुन घेत असतना दोघा आरोपींनी फिर्यादीला शिवगाळ केली म्हणुन फिर्यादीचे सासु–सासरे व शेजारी राहणारे कमल संजय वाकरेकर, भाऊ धोंडी पाटील, मुगल दत्तात्रय पाटील, वंदना निवास लोकरे, अनिता अनिल पाटील असे भांडण सोडवण्याकरिता आले असता आरोपी सागर पाटील याने फिर्यादीच्या सासु–सासरे यांना सुध्दा धक्काबुक्की करुन ''आता तुमच्या घराला जिवंत सोडणार नाही'' अशी धमकी दिली.

**०४.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कळे पोलीस ठाणेत आरोपींविरुध्द गु.र.न.५८/२०२१ भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४,३५४(अ), ३५४(ब),२९४,३५२,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा दाखल झाला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल एस. व्ही. पाटील यांनी केला असुन तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, कपडे जप्तीचा पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्ण नोंदवली, जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त केली, तसेच आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०५.** माझे पूर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.९ नुसार भारतीय दंड संहिताचे शिक्षापात्र कलम ३५४(ब),३२३,५०४,५०६

सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवुन आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. तसे आरोपींचे निवेदन नि.क्र.१० व ११ वर नोंदविण्यात आले.

**०६.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेसाठी एकुण आठ साक्षीदारांचा साक्षीपुरावा नोंदवला असुन अभियोगपक्षाने कांही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन नि.क्र.१ कडे दि.१६/०३/२०२६ रोजी आदेश पारित करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. तद्नंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन (नि.क्र.५६ व ५७) कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहे –

| अ.क्र | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतात का की, दि.२४/०४/२०२१ रोजी सकाळी ०९.४५ चे सुमारास फिर्यादी ''X" यांचे राहते घरासमोर रोडवर, सुळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुरःसरनार्थ फिर्यादीला विवस्त्र करण्याच्या उद्देशाने आरोपी क्रं.१ सागर याने फिर्यादीवर हल्ला करुन फौजदारी बल वापरुन फिर्यादीचे ब्लाऊजमध्ये हात घालुन फिर्यादीचा ब्लाऊज व साडी फाडून तिचे मनास | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले व त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३५४(ब) सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| २. | अभियोग पक्ष हे शाबीत करते काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी, आरोपी यांनी त्यांचे समान उद्देशाचे पुर:सरणार्थ आरोपी क्रं.१ सागर याने फिर्यादीला हाताने मारहाण करुन तसेच आरोपी क्रं.२ तेजस्विनी हिने फिर्यादीचे अंगावर मिरचीपुड टाकुन दोन्ही आरोपींनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहान करुन स्वेच्छेने दुखापत पोहोचवली व त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्ष हे शाबीत करते काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुरःसरनार्थ फिर्यादीस व साक्षीदारास उद्देशपुर्वक अपमानीत करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केले व त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ४. | अभियोग पक्ष हे शाबीत करते काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुरःसरनार्थ फिर्यादी व साक्षीदारास ''तुझ आता काय खर नाही'' ''आता तुमच्या घराला जिवंत सोडणार नाही'' अशी जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करणेत येते. |

## का र ण मि मां सा

**प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ करीताः**

०८. ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपींचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

०९. अभियोगपक्षातर्फे मुख्य साक्षीदार क्रं.१ फिर्यादी ''X'' **(फिर्यादी/नि.क्र.१६)** यांचे मौखीकपुराव्यामध्ये असे आले आहे की, त्या सुळे गावात त्यांचे पती प्रकाश, मुलगा तनिष्क व सासु असे एकत्रित राहण्यास असुन त्यांचे शिक्षण एम.ए.डी.एड. झाले आहे. त्या आरोपींना ओळखतात. आरोपी त्यांच्या समोर राहण्यास आहेत. आरोपी न्यायालयात हजर आहेत. आरोपी व त्यांच्यामध्ये सुरुवातीला शेजारी असल्या कारणावरुन संबंध चांगले होते. आरोपींना मुलगा झाला ते त्याला शौचालयासाठी घरा-समोरच दारात बसवत व त्याची विष्ठा त्यानंतर धुवून ती त्यांच्या दारात येत होती. त्यावरुन आरोपींच्यात व त्यांच्यात वाद झाले होते व तद्नंतर संबंध पहिल्या सारखे राहिले नाहीत. घटना ही दि.२४/०४/२०२१ रोजीची सकाळी ९-४५ वाजताची आहे. घटनास्थळ हे ते राहत असलेल्या घराच्या दारातील आहे. त्यादिवशी सकाळी ८-३० वाजता त्यांनी दारातील कचरा काढला व दारासमोर लोटून आत गेले. त्यानंतर सकाळी ९-०० वाजता तिचे पती जनावरांची वैरण घेवून घरी आले व त्यांनी तिला दारातूनच पिण्यासाठी पाणी व हातपाय धुण्यासाठी पाणी घेवून येण्यास सांगितले. ती पिण्यासाठी पाणी

घेवून आली. तिच्या पतीने दारात उभे राहूनच पाणी पिले. त्यावेळी ती तेथेच उभी होती. त्यावेळी सागर आनंदा पाटील त्यांच्या दाराच्या समोर म्हशीला पाणी पाजत होता. त्यांच्याम्हशीने त्यावेळी रस्त्यावर शेण टाकले. ते तेथेच थोडा वेळ होते. तिने पाहिले की, सागर आनंदा पाटील यांच्या पत्नीने त्यावेळी त्यांच्या समोर असलेले शेण उचलले साक्षीदाराच्या बाजुला पडलेले शेण उचलले नाही. सदरची बाब ही तिचे पती व तिच्या सासू-सास-यांनी देखील पाहिलेली आहे. आरोपी क्रं.२ हिने शेण उचलले नाही यावरुन तिने थोडी बडबड केली व म्हणाली रोजरोज यांची घाण कोण साफ करणार, आम्हालाच करावी लागेल. तिचे पती, सासू-सासरे तिला समजावून सांगत शांत राहण्याचा सल्ला देत होते व ते म्हणत होते की, सागर आनंदा पाटील आल्यानंतर आपण त्याला व त्याच्या घरच्यांना सांगू या. तिच्या सासुबाईने दारातील शेण काढून टाकले व ते त्यांच्या कामाला लागले.

**१०.** फिर्यादी ''X'' यांचे मौखीक पुराव्यामध्ये पुढे असे आले आहे की, सकाळी त्याचदिवशी ९-४५ वाजा ती कपडे वाळत घालण्यास गॅलरीमध्ये जात होती त्यावेळी तिला सागर आनंदा पाटील दिसले. ती कपडे वाळत घालत असताना सागर आनंदा पाटील यांची पत्नी आरोपी क्रं.२ यानी दारातून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली की, "रांड बाहेर ये आता कुठे बसलीस सकाळी पासून बडबड करत होतीस.'' ते एकुन तिची सासुबाई घरातुन दरवाज्यात आल्यावर आरोपी क्रं.२ हिला म्हणू लागल्या की, तिने तुला शिव्या दिलेल्या नाहीत तु कशाला शिव्या देत आहे. शेण आम्ही उचलले आहे. त्यावर आरोपी क्रं.२ सासुबाईला शिवीगाळ करु लागली. त्यावर तिने गॅलरीतुन आरोपी क्रं.२ ला उद्देशून म्हणाले की, शिव्या वगैरे देवू नकोस आम्ही शेण उचलले आहे. त्यावर आरोपी क्रं.२ म्हणाली की, तु वर का थांबली

आहेस, खाली ये, तुला हिसका दाखवितो. ते ऐकुन ती गॅलरीतुन खाली आली. त्यावेळी सागर आनंदा पाटील तिला शिवीगाळ करु लागला की, "रांड झवून घेणार होतीस का रस्त्यावर सोय–याला घेवुन, रस्त्यावर झोपणार होतीस म्हणुन तुला शेण काढून हवे होते.’’तिचे सासरे ते ऐकुण रस्त्यावर गेले व सागर आनंदा पाटील याला समजावुन सांगू लागले. तर त्यावर सांगर आनंदा पाटील म्हणाला की, तुमच्या घराला जिवंत सोडणार नाही, ठार मारणार. त्याच्या दारात ठेवलेले दांडके उचलून तो सासू–सास–यांच्या अंगावर धावून आला. त्यावर तिने देखील ठार मारणार आहेस का मार मला, असे म्हणुन पुढे गेली. तेव्हा त्याच्या पत्नीने तिच्या डोळयावर, तोंडावर मिरची पुड टाकली. तिला धक्का बुक्की व मारहाण करु गाले. झटापटीमध्ये त्यांनी तिचे गळयातील मंगसुत्र तोडले. सागर याने तिच्या सास–यांना लाकडी दांडक्याने खांदयावर मारुन त्यांना दाराच्या पायरीवर ढकलले. तिची सासु अडविण्यास गेली असता सागर आनंदा पाटील तिच्या अंगावर धावून आला. त्याने अंगावर घातलेले तिचे ब्लाऊज फाडले. त्याने ब्लाऊजला पिन केलेले देखील विसकटून टाकले. तिच्या अंगावर त्या सर्व प्रकारात आरोपीच्या हाताची नखे ओरबडली.

**११.** फिर्यादी ’’X’’ यांचे मौखीक पुराव्यामध्ये पुढे असे आले आहे की, तिचे सासू–सासरे तिच्या मदतीला येवून सागर आनंदा पाटील याच्या अंगावर धावून जावू लागले. त्यावेळेस ती त्यांना अडवून योग्य काय ते पाऊल उचलुया असे सांगितले. तिने दारातूनच तिचा मोबाईल मुलाकडून मागून घेतला. तिचे पती त्यावेळी घरी नव्हते. तिच्या गळयातील तुटलेल्या मंगळसुत्राची आर्धी पोत तिच्या सासुने तिला रस्त्यावर पडलेली उचलून दिली. त्यानंतर ती वाघुर्डे गावापर्यंत चालत आली. तेथे तिचे पती गाडी घेवुन आले. त्यांच्यासोबत ती कळे पोलीस स्टेशन येथे फिर्याद देण्यासाठी आली. झालेला

सर्व घटनाक्रम सांगितला. दुर्गूळे मॅडम यांनी अंगावर असलेले नखाचे वार पाहिले. त्यानंतर एफ.आय.आर लिहून घेतला. पोलीस स्टेशनला त्या मॅडम व्यतिरीक्त नामदेव चव्हाण व आणखी एक अधिकारी होते.

**१२.** फिर्यादी ''X'' यांचे मौखीक पुराव्यामध्ये पुढे असे आले आहे की, साक्षीदारास तिने दाखल केलेली तक्रार (नि.क्र.१७) दाखविण्यात आली असता त्यावर तिची सही आहे, तसेच महिला दक्षता समिती सदस्या चौगुले मॅडमची सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे असे सांगितले. त्यावेळी संगणीकृत प्रथम खबर (नि.क्र.१८) जारी करण्यात आली होती. त्यावर तिची सही घेण्यात आली आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर त्या घरी गेल्या. घटनेच्या दुस–या दिवशी दि.२५/०४/२०२१ रोजी पोलीस घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी आले. पंचनाम्यासाठी शंकर पाटील पोलीस अधिकारी, तानाजी शिवाजी पाटील व सुरेश महादेव पाटील हे देखील सोबत होते. सदरचे घटनास्थळ पोलीसांना तिने दाखविले आहे. त्यावेळेस वेळ अंदाजे सकाळी ११–३० वाजण्याची होती. पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी वगैरे केली. तिची पंचनाम्यावर सही घेतली. तसेच त्या कागदावर नमुद शंकर पाटील, तानाजी पाटील व सुरेश पाटील यांची सही असुन या लोकांनी तिच्या समक्ष सहया केल्या आहेत. सदर पंचनाम्यातील (नि.क्र.१९) मजकुर खरा व बरोबर आहे.

**१३.** फिर्यादी ''X'' यांचे मौखीक पुराव्यामध्ये पुढे असे आले आहे की, घटनास्थळी पंचनाम्याच्या वेळेस पोलीसांनी रस्त्यावर पडलेली चटणी पुड व ब्लाऊजचे दोन हुक जप्त केले होते. त्याच दिवशी तिचे पती घटनेच्या दिवशीची साडी व ब्लाऊज घेवुन कळे येथे पोलीस ठाण्यात आले. पोलीसांनी तिच्या समक्ष सदर साडी व ब्लाऊज जप्त केले. त्यावेळी तानाजी पाटील व

सुरेश पाटील हे पंच म्हणुन हजर होते. त्यादिवशीचा जप्ती पंचनामा तयार केला. सदरचा पंचनामा १–०० वाजता सुरु होवुन १–४५ वाजता संपला. त्यावर तिची सही घेतली. तसेच त्या कागदावर नमुद शंकर पाटील, तानाजी पाटील व सुरेश पाटील यांची सही असुन सदर लोकांनी तिच्या समक्ष सहया केल्या आहेत. सदर पंचनाम्यातील (नि.क्र.२०) मजकुर खरा व बरोबर आहे. जप्त करण्यात आलेला ब्लाऊज हा पिंक कलरचा मागच्या बाजुस हिरवी पट्टी लावलेली होती. साडी पिवळया कलरची व त्यावर हिरव्या कलरची फुले होती. साक्षीदारास मुद्देमाल क्र.४३/२०२२ दाखविण्यात आला असता तो कागदी लिफाफयामध्ये सिलबंद आहे, सदरचा लिफाफा हा सरकारी वकील व आरोपींच्या वकीलांसमक्ष उघडण्यात आला असता त्यामध्ये साक्षीदाराने वर्णन केलेली साडी व ब्लाऊज आहे. ते अनुक्रमे वस्तु १ व २ वर दाखल आहेत. नि.क्र.१९ वर जप्त करण्यात आलेलले दोन हुक व मिरची पुड चा काही भाग दाखविल्यास त्या ओळखु शकतात. साक्षीदारास मिरची पुड दाखविण्यात आली असता ती तीच आहे, त्यास अनुक्रमे वस्तु ३ देण्यात आली. त्यानंतर ती घरी गेली. तिला दि.२७/०४/२०२१ रोजी न्यायालयात जबाब देण्या कामी बोलविण्यात आले होते. तिने न्यायालयात येवून जबाब दिला. त्यावेळी तिने त्यावर सही केली होती. सदरचा जबाब दाखविण्यात आला असता त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यावर तिची सही आहे असे सांगितले. सदरचा जबाब नि.क्र.२१ वर दाखल आहे.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ सखाराम गणू पाटील **(जखमी साक्षीदार/नि.क्र.३०)** यांनी त्यांचे साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, आरोपी क्रं.१ व २ हे भाऊबंद असुन फिर्यादी ही त्यांची सुन आहे. दि.२४/०४/२०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता आरोपी क्रं.२ ने त्यांच्या

दारात शेण लोटून लावले त्यावर त्यांची सुन फिर्यादी हिने आरोपी क्रं.२ ला का माझ्या दारात शेण लोटून लावले म्हणुन विचारणा केली असता त्यामध्ये फिर्यादी व आरोपी क्र.२ यांच्यामध्ये हातापायी होवू लागली. त्यामध्ये आरोपी क्र.२ ने त्यांच्या सुनेच्या गळयातील डोर्ले तोडले. त्यावेळी ते व त्यांची पत्नी घरीच होते. त्यांनी सदरची भांडणे सोडवायला मदत केली असता आरोपी क्र.१ ने त्यांच्या दंडाला धरुन त्यांना एक तडाका दिला. त्यामुळे ते जमीनीवर पडले. त्यांची सुन कळे पोलीस स्टेशनला फिर्याद देणेस चालली असता आरोपी क्र.२ ने तिच्या डोळ्यात चटणी फेकली. त्यानंतर त्यांच्या सुनेने कळे पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतला होता.

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ तानाजी शिवाजी पाटील **(जप्ती पंच/नि.क्र.३४)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.२५/०४/२०२१ रोजी कळे पोलीस स्टेशन यांनी त्यांना फिर्यादी ''X'' यांचे दारा समोर पंचनामा करणेकामी बोलावले होते. त्या ठिकाणी पोलीसांनी मिरची पावडरचा पंचनामा त्यांचे समक्ष केला. तो त्यांनी नि.क्र.१९ वर असल्याचे सांगितले. सदर पंचनाम्यावर अनुक्रमांक १ वर त्यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर ते कळे पोलीस स्टेशनला गेले. त्याठिकाणी पोलीसांनी फिर्यादी यांचा कपडे जप्तीचा पंचनामा नोंदवला. सदरचा पंचनामा नि.क्र.२० ला दाखल असुन तो पंचनामा तोच असल्याचे सांगितले. त्यांना नि.क्र.२० वर वस्तू १ साडी व दोन ब्लाऊज दाखवले असता ते तेच असल्याचे सांगितले. वस्तू ३ मिरची पावडर दाखवल्यास ते ओळखु शकतात. मिरची पुड जेव्हा पोलीसांनी जप्त केली तेव्हा पोलीसांनी लेबल लावले होते. त्या लेबलवर त्यांची व सुरेश महादेव पाटील

यांची सही आहे. सदरचे लेबल ते ओळखतात कारण ते त्यांच्या समोर पोलीसांनी लावले आहे.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ डॉ. विदयानंद हिंदूराव शिरोलीकर **(वैद्यकीय अधिकारी/नि.क्र.४०)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.२४/०४/२०२१ रोजी त्यांनी फिर्यादी यांची वैद्यकीय तपासणी पोलीस यादीवरुन केली. फिर्यादी यांना जखमा कशामुळे झाल्या याचे वर्णन केले होते. त्यानुसार त्यांनी एम.एल.सी.नं.१६१/२०२१ तयार केले. त्यामध्ये ओरखडयाच्या खुणा गळयाला व इतर शरीरावर असुन सदरच्या जखमा हया जाड व बोथट हत्याराने होऊ शकतात. सदरच्या जखमा हया २४ तासाच्या आतील असुन उजव्या हाताला ओरखडा व शरीराच्या अन्य भागावर ओरखडे असुन सदरची जखम ही साध्या स्वरुपाची असुन २४ तासाच्या आतील होत्या. ओरखडयाच्या खुणा हया शरीराच्या ब–याच भागावर झाल्या असुन त्या जाड व बोथट हत्याराने होऊ शकतात. तसेच सदरच्या जखमा हया २४ तासाच्या आतील आहेत असे सांगून एम.एल.सी.नं.१६१/२०२१ दि.११/०६/२०२१ रोजी तयार केले. त्यानंतर त्यांनी २४/०४/२०२१ रोजी जखमी सखाराम गणू पाटील यांना पोलीसांनी दिलेल्या यादीवरुन तपासले. त्यांनी मारहाणीच्या घटनेविषयी सांगितले. त्यानुसार त्यांनी एम.एल.नं.१६२/२०२१ दि.११/०६/२०२१ रोजी तयार करुन ते जखमीला व पोलीसांना दिले. ते नि.क्र.४२ वर दाखल आहे. त्यांना देखील बाहय अंगावर कोणत्याही जखमा आढळुन आल्या नहीत.

**१७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ डॉ. विदयानंद हिंदूराव शिरोलीकर यांचे पुराव्यामध्ये पुढे असे आले आहे की, दि.२४/०४/२०२१ रोजी सोनाबाई सखाराम पाटील या त्यांच्या हॉस्पीटलला पोलीस यादी सोबत

आल्या होत्या. त्यांनी मारहाणीच्या घटनेविषयी त्यांना सांगितले. त्यानुसार त्यांनी एम.एल.सी.नं.१६३/२०२१ अदा केले. त्यामध्ये बाहयअंगावर कोणत्याही जखमा नसल्याचे नमुद केले. त्याप्रमाणे त्यांनी दि.११/०६/२०२१ रोजी एम.एल.सी.नं.१६३/२०२१ तयार केले व ते नि.क्र.४३ अन्वये अभिलेखावर दाखल असुन त्यावर त्यांची सही व हॉस्पीटलचा शिक्का आहे.

**१८.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ कमल संजय वाकरेकर **(साक्षीदार/नि.क्र.४५),** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.६ अनिता अनिल पाटील **(साक्षीदार/नि.क्र.४६)** व अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.७ वंदना विश्वनाथ ढोकरे **(साक्षीदार/नि.क्र.४७)** यांनी त्यांचे सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, त्या फिर्यादी व आरोपी यांना ओळखतात कारण ते त्यांच्या गावातील राहणारे आहेत. आरोपी व फिर्यादी यांचे घर आमने–सामने आहे. दि.२४/०४/२०२१ रोजी आरोपी व फिर्यादी यांच्यात सकाळच्या दरम्यान काय घटना घडली या विषयी त्यांना माहिती नाही. आरोपी क्र.१ ने फिर्यादीचा विनयभंग केला नाही व आरोपी क्रं.१ व २ यांनी फिर्यादीला मारहाण केली नाही असे कथन केले. सदर तिन्ही साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे त्यांची साक्ष अभियोगपक्षाकरिता निरुपयोगी ठरली आहे. परंतु आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपसामध्ये त्यांनी असे मान्य केले आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्या दोघांच्या घरासमोर रस्ता असुन त्या रस्त्याने सर्व गल्लीतील जनावरे नदीकाठी पाणी पिण्यास व चरण्यास जातात. आरोपींची जनावरे राहत्या घराजवळ नसुन ती बाजुला आहेत. त्यांच्या गल्लीचा गणेश महिला बचत गट होता व तो फिर्यादी चालत होती. आरोपी क्रं.२व फिर्यादीमध्ये बचत गटातील आर्थिक व्यवहारावरुन वाद

झाले याविषयी या तिन्ही साक्षीदारांना माहित नसल्याचे त्यांनी सांगितले.

**१९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ शंकर विष्णू पाटील **(तपासी अधिकारी/नि.क्र.४९)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, गु.र.नं.५८/२०२१ चा तपास त्यांच्याकडे पोलीस हवालदार चौगले यांच्या आदेशान्वये आला. लेखी आदेशावर तपासी अंमलदार म्हणुन चौगले यांची सही आहे. तो नि.क्र.५० वर दाखल आहे. सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा नोंदवला. घटनास्थळ हे त्यांना फिर्यादीने दाखवले. घटनास्थळ हे फिर्यादी राहत असलेल्या गल्लीतील रस्ता आहे. पंचनामा नोंदवल्यावर घटनास्थळावरुन त्यांनी मिरची पूड व साडी व ब्लाऊज जप्त करुन घेतले. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवून घेतले. साक्षीदार क्र.५ कमल वाकरेकर, साक्षीदार क्रं.६ अनिता पाटील व साक्षीदार क्रं.७ वंदना ढोकरे यांचे जबाब त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रामणे नोंदवले असुन ते नि.क्र.५१ ते ५३ कडे दाखल आहेत. जप्त मिरची पूड कळे पोलीस स्टेशन येथील मुद्देमाल शिरस्तेदार यांच्याकडे जमा करुन त्याची पावती तयार केली. सदरच्या पावतीवर शिरस्तेदाराची सही असुन ती नि.क्र.५४ वर आहे. त्यानंतर त्यांनी तिन्ही जखमींचे वैद्यकीय प्रामणपत्रे मिळणेकामी वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कळे यांना नि.क्र.५५ अन्वये पत्र केले. त्यानंतर जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन प्रस्तुत कामात सामील केले. तपासाअंती आरोपींनी गुन्हा केलयाचे निष्पन्न झालेने त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले. त्यांनी न्यायालयात आरोपी हजर असल्याचे सांगितले तसेच आर्टीकल १ व २ वरील ब्लाऊज व साडी ओळखली आहे.

**२०.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा

सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**२१.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ ''X'' (फिर्यादी/नि.क्र.१६) यांचे आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, त्यांचा विवाह दि.२५/०५/२०१० रोजी सुळे या गांवी झालेला आहे. सुळे या गांवी त्यांचे घर गणेश मंदीराजवळ टी.कॉर्नर येथे आहे. सुळे ते आकुर्डे या रस्त्याच्या तुलनेत त्यांच्या गल्लीतील वाहनांची वर्दळ कमी प्रमाणात असते कारण सदरच्या गल्लीतील रस्ता जरी सिमेंटचा असला तरी तो अरुंद स्वरुपाचा आहे. त्यांच्या गल्लीतील रस्ता हा धरणाकडे जाण्यासाठी सगळयात जवळचा रस्ता आहे. गणेश गल्लीला लागूनच कमल वाकरेकर यांचे घर आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुने सांडपाणी वाहुन जाण्याकरिता गटारांची सोय केलेली आहे. त्यांनी त्यांच्या घरासमोरील असलेल्या गटारावर कट्टा बांधून त्यावर सुशोभिकरण केलेले आहे. आरोपींचे साई मंदीराकडे जाण्याच्या रस्त्यावर दक्षिणबाजुला जनावरांचे शेड आहे. आरोपींची जनावरे त्यांच्या घरासमोर बांधण्यात येत नाहीत. आरोपींचे सांडपाणी घरासमोर असलेल्या गटारीमध्ये सोडलेले आहे. त्या गणेश महिला बचत गटाचे काम, आर्थिक व्यवहार पाहतात. आरोपी क्रं.२ या गटाच्या पुर्वी सभासद होत्या. त्यांच्या बचत गटाचे आर्थिक व्यवहार म्हणजेच एखादया सदस्याला उचल देणे किंवा एखादया सदस्याकडून रक्कमेवरील व्याज वसूल करण्याचे काम त्या स्वत: करतात. तानाजी पाटील व सुरेश पाटील हे त्यांच्या गावातील प्रतिष्ठीत नागरिक आहेत. तानाजी शिवाजी पाटील हे त्यांचे पती प्रकाश पाटील यांचे मावस भाऊ आहेत.

२२. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ ''X'' यांनी उलटतपासामध्ये असे कथन केले आहे की, दि.२४/०४/२०२१ रोजी सकाळी ९.४५ वाजताचे सुमारास त्या कपडे वाळत टाकण्यासाठी गॅलरीत गेल्या तेव्हा त्यांच्या घरात त्यांचे सासु–सासरे व मुलगा हजर होते. त्यांचे सासु–सासरे स्वत:ची कामे स्वत: करतात. ग्रामीण भागात जनावरांना चरण्यासाठी रस्त्यावरुन नेत असताना ते निट चालत नसले तर त्यांना उद्देशुन शिवीगाळ केली जाते तसेच मारहाण देखील केली जाते. नदीकडे जाणा–या रस्त्यावर गुरे चरण्यासाठी नेणा–या गुराखी लोकांची तसेच इतर जनावरांची वर्दळ राहते. त्यांच्या सासु–सास–यांना आरोपी शिवीगाळ करत असताना ती समोर गेली असता त्यांच्या डोळयावर चटणीपुड टाकल्याने त्यांना समोरचे दिसेनासे झाले. त्यांच्या डोळयात चटणीपूड टाकल्यानंतरची घटना त्या बघू शकल्या नाहीत. त्यांचे अर्धे मंगळसुत्र गहाळ झाल्याची तक्रार त्यांनी कळे पोलीस स्टेशनला दिली नाही. जप्त मुद्देमालातील मिरची पूड ही त्यांनी पोलीसांना दिलेली होती ती तीच आहे. त्यांनी घटनास्थळावरुन पोलीसांना फोन केला नाही. परंतु, त्यांनी त्यांच्या पतीला फोन केला व ते त्यांना घेण्यासाठी घरी आले नव्हते. पोलीसांना घटनास्थळ फिर्यादीने दाखवल्यानंतर पोलीस त्यासंच्या घरी आले व त्यांनी फिर्यादीच्या घरी बसुन पंचनामा नोंदवला. त्यानंतर पंच सुरेश पाटील व तानाजी पाटील यांनी सदर तयार पंचनामेवर सहया केल्या. पंच तानाजी पाटील हे फिर्यादीचे पतीचे सख्खे मावस भाऊ आहेत.

२३. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ फिर्यादी ''X'' यांनी उलटतपासामध्ये असे कथन केले आहे की, गावातील लोक जनावरांना पाणी पाजण्यासाठी तसेच गावातील स्त्रीया हया पाण्याला जाण्यासाठी याच गल्लीचा

वापर करतात. फिर्यादीने बांधलेल्या कट्टयामुळे गावातील लोकांना जाताना–येताना अडचण होते. आरोपी क्रं.२ यांचा मुलगा शौर्य याला आंघोळ घालणे, प्रात:विधी करणे हे सर्व त्याच्या घरात करतात. गणेश बचत गटाचे व्यवहार पाहण्यासाठी त्यांनी मोबदल्याची मागणी केली व त्यास आरोपींचा व इतर महिलांचा विरोध होता. आरोपीने तिचे सदस्यत्व कमी करुन घेतले कारण तिला आवश्यक असणारी कर्ज रक्कम मिळाली नाही. ज्या कर्ज रक्कमेची मागणी आरोपीने केली ती रक्कम न देण्याचे कारण म्हणजे गावातील अन्य लोकांना त्यांनी टक्केवारीने बचत गटाची रक्कम दिलेली नव्हती. महिला बचत गटातील अपेक्षा पाटील, अश्विनी पाटील व विलास पाटील यांनी सदरचा गट सोडला होता. त्यांच्या सासू सास–यांनी तक्रार देवू नको असे म्हणुन त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यात व आरोपींमध्ये जाणे–येण्याच्या कारणावरुन भांडण असल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. आरोपी क्रं.१ ने फिर्यादीचा ब्लाऊज फाडून तिच्या अंगावरील साडीच्या पदराची पिन विस्कटुन टाकली होती. पोलीसांनी त्यांच्या ब्लाऊजची हुके जप्त केली होती. सदरचे हुक त्यांनी पोलीसांना स्वत:हुन दिले नाहीत. जबाब कसा दयायचा याची माहिती त्यांना पोलीसांनी दिली होती. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये नोंदवलेला जबाब त्यांनी केवळ आरोपीच्या विरुध्द राग मनात धरुन दिलेला आहे. त्यांनी महिला बचत गट तयार केला होता. त्यामध्ये आरोपी क्रं.२ यांचे देखील खाते होते व सदर खात्याचा देखील व्यवहार ते पाहत असल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रस्तुतची खोटी केस दाखल केली आहे. ग्रामपंचायत व आरोग्य केंद्राकडून कोणतीही कारवाई न झाल्यामुळे प्रस्तुतची खोटी फिर्याद आरोपींविरुध्द दाखल केलेली आहे. या सर्व बाबी साक्षीदाराने उलटतपसामध्ये नाकारलेल्या आहेत.

**२४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ सखाराम गणू पाटील (जखमी साक्षीदार/नि.क्र.३०) यांनी त्यांचे उलटतपसामध्ये मान्य केले आहे की, त्यांचे राहते घर पानवट्याच्या रस्त्याला असुन त्यांची सुन शिक्षीका आहे. त्यांची सुन गावात बचतगट चालवते. आरोपी क्रं.२ ही त्यांच्या सुनेच्या बचतगटातील सदस्या होती. घटना कोणत्या तारखेला किती वाजता घडली हे त्यांना सांगता आले नाही. त्यांचे आजरोजी फिर्यादी व आरोपी क्रं.२ यांच्यात बोलणे–चालणे नाही. आरोपी क्रं.१ ने फिर्यादी ''X'' चा हात पकडलेला नाही. त्या त्यांच्या सुनेसोबत पोलीस स्टेशनला गेल्या नसल्या कारणाने तिने आरोपी क्र.१ व २ विरुध्द काय तक्रार दिली या विषयी त्यांना माहिती नाही. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

**२५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ तानाजी शिवाजी पाटील (जप्ती पंच/नि.क्र.३४) यांनी उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, प्रस्तुत कामातील फिर्यादीचे पती प्रकाश हे त्यांचे मावस भाऊ आहेत व सुरेश पाटील हे त्यांच्या गावचे तंटामुक्ती अध्यक्ष होते व आज देखील आहेत. नि.क्र.१९ वरील पंचनाम्यात पोलीसांनी चतु:सिमा नमुद केल्या आहेत. ते म्हणत असलेला पंचनामा नि.क्र.१९ वरील पंचनामा नाही. पोलीसांनी मिरचीपूड ज्या प्लॅस्टीक पिशवीमध्ये जप्त करुन घेतली ती त्यांच्या समक्ष सिल केली नाही. पोलीसांनी त्यांना पोलीस स्टेशनला या असा फोन केला नाही. तंटामुक्ती आदेश सुरेश महादेव पाटील यांना त्यांनी फोन करुन बोलवून घेतले होते. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष वस्तू १ व २ करिताचा पंचनामा तयार केला. फिर्यादी व फिर्यादीचे पतीने पंचनाम्यातील मजकुर सांगितला व तो पोलीसांनी नमुद करुन घेतला. नि.क्र.२०वरील पंचनाम्यावरील सही त्यांनी पोलीसांच्या सांगण्याप्रमाणे केली. फिर्यादीच्या दारात दोन सहया व पोलीस स्टेशनला दोन

सहया या व्यतीरिक्त त्यांनी अन्य कोणत्याही कागदावर सही केली नाही.

**२६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ डॉ. विदयानंद हिंदूराव शिरोलीकर (वैद्यकीय अधिकारी/नि.क्र.४०) यांनी त्यांचे उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, जर एखादया व्यक्तीच्या डोळयात मिरची पावडरचा हल्ला झाल्यास वर नमुद जखमा होऊ शकतात. सदर तिन्ही जखमींनी त्यांना मिरची पावडरच्या हल्ल्याविषयी त्यांना सांगितले नव्हते. नि.क्र.४१ मधील नमुद असलेल्या जखमा सदर पेशंटने सांगितल्या नव्हत्या. त्यांनी पेशंटकडे मारहाणी विषयी चौकशी केली होती. सदर तिन्ही पेशंट त्यांच्याकडे उपचाराकरिता पोलीस यादी अन्वये आले होते.त्यानुसार त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये तिन्ही जखमी हे पोलीस यादीसह आले असल्याची बाब सांगितली होती. त्यांना फिर्यादीने मारहाणीच्या घटनेविषयी सांगितले नव्हते. वर नमुद जखमा हया माणसाच्या किंवा अन्य प्राण्याच्या नखाने ओरबडल्याने होऊ शकतात परंतु त्यातुन रक्त वाहु शकत नाही ही बाब त्यांनी मान्य केली.

**२७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ शंकर विष्णू पाटील (तपासी अधिकारी/नि.क्र.४९) यांचे उलटतपासामध्ये त्यांनी मान्य केले आहे की, दि.२४/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल झाला. तपास त्यांच्याकडे दि.२५/०४/२०२१ रोजी देण्यात आला. गु.र.नं.५८/२०२१ चा तपास त्यांनी केला कारण सुळे गांव हे त्यांच्या बिटामध्ये येत असुन त्यांनी प्रस्तुतचा गुन्हा नोंद केला. सुळे बिट हे त्यांच्याकडे येत असल्या कारणाने त्या गांवची स्थानिक माहिती त्यांना आहे. सन २०२१ मध्ये सुळे गांवचे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील हे होते. नि.क्र.५० वरील गु.र.नं.५८/२०२१ च्या लेखी आदेशावर सदरचा तपास त्यांना दि.२५/०४/२०२१ रोजी देणेत

आला याची नोंद नाही तसेच प्रथम खबरी अहवाल नि.क्र.१८ वर सदरचा गुन्हा दि.२४/०४/२०२१ रोजी रात्री १०.४५ वाजताचे सुमारास नोंद झाली आहे. नि.क्र.५० वरील लेखी आदेशान्वये सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे दि.२३/०४/२०२१ रोजी देणेत आला.

२८. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ शंकर विष्णू पाटील यांनी उलटतपसामध्ये पुढे असे कबुल केले आहे की, फिर्यादी व आरोपी यांचे घर एकमेकांसमोर आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये यापूर्वी देखील वाद होते. फिर्यादी ही त्यांच्याच गावातील गणेश महिला बचत गट चालवते. फिर्यादी व आरोपींच्या घराच्या आवती भोवती इतर लोकांची घर आहेत. घटनास्थळ पंचनामा त्यांनी फिर्यादीच्या सांगण्यावरुन नोंदवला. रस्त्यावर पडलेली मिरची पूड त्यांना प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये संकलन करण्यास कोणतीही अडचण नव्हती. नि.क्र.२० वरील कपडे जप्ती पंचनामेवर फिर्यादीचे गांव कळे नमुद असुन त्यातील मजकुर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नमुद केला आहे. साक्षीदार क्रं.२ सखाराम गणू पाटील हे फिर्यादीचे सासरे आहेत तर पंच तानाजी पाटील हे फिर्यादीचे पती प्रकाश पाटील यांचे मावस भाऊ आहे. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार म्हणून फिर्यादीचे पतीची त्यांनी साक्ष नोंदवलेली नाही. वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन फिर्यादीचे सासरे व सासु यांना कोणत्याही जखमा झालेल्या नाहीत. आरोपी क्रं.१ व २ यांच्या नखाचे व फिर्यादीच्या मानेवरील ओरखडे असल्याने फिर्यादीच्या त्वचेचा नमुना घेवून तो विशेष तज्ज्ञांकडे पाठवले नाही. त्यांनी वंदना ढोकरे यांचे तपास टिपण नोंदवून घेतले नाही.

२९. एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ फिर्यादी

यांच्यात व आरोपींमध्ये पुर्वी असलेल्या वादातुन प्रस्तुतची केसची निर्मिती झाल्याची बाब पुराव्याअंती समोर येते. आरोपीच्या मुलगा हा फिर्यादीच्या व आरोपीच्या घरासमोर असलेल्या रस्त्यावर प्रात:विधी करतो तसेच जनावरांचे शेण व मलमुत्र हे त्यांच्या दारात येत असल्याच्या किरकोळ कारणावरुन फिर्यादीने आरोपीविरुध्द प्रस्तुतची केस दाखल केली आहे. फिर्यादी ही गणेश महिला बचत गट चालवित असुन आरोपी क्रं.२ ला ज्या कर्ज रक्कमेची मागणी केली होती ती रक्कम फिर्यादीने त्यांना न देणेचे कारण म्हणजे गावातील अन्य लोकांना त्यांनी टक्केवारीने बचत गटाची रक्कम देवू केली होती.

**३०.** त्यांच्या बचत गटाचे आर्थिक व्यवहार म्हणजे जसे की, एखादया सदस्याला उचल देणे तसेच एखादया सदस्याकडून रक्कमेवरील व्याज वसुलीचे काम हे फिर्यादी करत होती. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ सखाराम गणू पाटील हे फिर्यादीचे सासरे असुन त्यांनी घटना कोणत्या तारखेला किती वाजता घडली तसेच आरोपी क्र.२ हिने त्यांची सुन फिर्यादी हिच्यावर बचत गटातील पैशांची अफरातफरीची तक्रार केली असल्याने आरोपी क्रं.२ ही सदर बचत गटात नाही. त्यांनी त्यांच्या उलटतपसात विशेष करुन असे मान्य केले की, आरोपी क्रं.१ ने फिर्यादीचा हात पकडलेला नाही.

**३१.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ तानाजी शिवाजी पाटील हे घटनास्थळ व जप्ती पंच असुन ते फिर्यादीचे पती प्रकाश पाटील यांचे मावस भाऊ आहेत. सहाजिकच त्यांनी फिर्यादी व फिर्यादीच्या पतीला मदत होईल अशी साक्ष नोंदवली आहे. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ डॉ. विदयानंद शिरोलीकर यांनी वर नमुद जखमा हया मानवाच्या किंवा इतर प्राण्याच्या नखांच्या ओरखडयाने होऊ शकतात असे मान्य केले परंतु सदरच्या जखमा

हया मानवी नखांच्या ओरखडयानेच झाल्या आहेत ही बाब त्यांनी विशेषत: नाकारली. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ कमल वाकरेकर, साक्षीदार क्र.६ अनिता पाटील व साक्षीदार क्रं.७ वंदना ढोकरे यांनी अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहाय्य केले नसल्यामुळे त्यांची साक्ष अभियोगपक्षाकरिता निरुपयोगी ठरलेली आहे.

**३२.** साक्षीदार क्रं.८ तपासी अंमलदार शंकर विष्णू पाटील यांनी रस्त्यावर पडलेली मिरची पूड त्यांना प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये संकलन करण्यास त्यांना कोणतही अडचण नव्हती ही बाब मान्य केली. सर्वात महत्वाची बाब म्हणजे त्यांनी घटनास्थळावरील सदर घटनेच्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा साक्षी नोंदवलेली नाही, सदर साक्ष नोंदवणेस त्यांना कोणतीही अडचण नव्हती. त्यांनी केवळ फिर्यादीच्या जवळचे नातेवाईक यांचीच साक्ष नोंदवलेली आहे. परंतु घटनास्थळावर उपस्थित असलेले स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्ष त्यांनी नोंदवलेली नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही. अभियोगपक्षाने कायद्याप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, फिर्यादीला विवस्त्र करण्याच्या उद्देशाने आरोपी क्रं.१ सागर याने फिर्यादीवर हल्ला करुन फौजदारी बळ वापरुन फिर्यादीचे ब्लाऊजमध्ये हात घालुन फिर्यादीचा ब्लाऊज व साडी फाडून तिचे मनास लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन केले, आरोपींनी फिर्यादीस मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पाहोचवली व वाईटवंगाळ शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **प्रश्नबिंदू क्रं.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.**

**<u>प्रश्नबिंदू क्र.५ करीताः</u>**

**३३.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३५४(ब),३२३,५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे आरोपींवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे आरोपी क्रं.१ व २ हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक ब्लाऊज व साडी तसेच मिरची पुड हे आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्नबिंदू क्र.५ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१. सागर आनंदा पाटील व आरोपी क्र.२ सौ. तेजस्वीनी सागर पाटील दाघेही रा. टी. कॉर्नर, गणे मंदीर शेजारी, सुळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३५४(ब),३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रक्कमेचा जामीन दयावा.

४. जप्त ब्लाऊज एक गुलाबी पुढील बाजुस तीन हुक आहे, ते तुटलेले दिसत असुन फाटलेले दिसत आहे, ब्लाऊजवर हिरवी पट्टी आहे जुना वापरता तसेच एक साडी ५ वारी तपकरी रंगाची हिरव्या फुलाची डिझायन असलेली पदरास फाटलेली जुनी वापरती व मिरची पुड

पांढ–या कागदात बांधलेली हे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Viashali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.13 18:28:27 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक –१३.०५.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर